
Reviews of Literature
ISSN 2347-2723

Impact Factor : 2.0210(UIF)
Volume - 2 | Issue - 2 | Sept - 2015

# शाहीर रामजोशींच्या उपदेशपर लावण्याा : स्वरुप आणि आशय



शांताराम शेलार
नाईट कॉलेज, इचलकरंजी.

## प्रस्तावना :

शाहीर राम जोशी यांच्या उपदेशपर किंवा वैराग्यवृत्तीवर एकूण २७ रचना आहेत. राम जोशींनी जो उपदेश केलेला आहे तो वेगवेगळ्याा दृष्टिकोनातून पहाता येतो. त्यांच्या उपदेशपर लावण्याचे वर्गीकरणानुसार विश्लेषण पाहू या.

१.नकारात्मक उपदेश : सर्व नश्वर आहे.
२.तात्विक विचार : जगाचे स्वरुप
३.परमेश्वराचे चिंतन : जीवाचे स्वरुप
४.संसारिकांना उपदेश : क्षणैक की चिरंतन

राम जोशींनी आयुष्याच्या उत्तरार्धात उपदेशपर रचना लिहिल्या त्यामध्ये मानवी वृत्तीला उपदेश केलेल्या आहेत. उपदेशपर रचनांचा क्रमशः विचार करु या.

## 1.नकारात्मक उपदेश : सर्व नश्वर आहे.

ज्या रचनांमधून नकारात्मक उपदेश मिळतो. त्यांची संख्या एकूण पाच आहे. त्यामधून संसाराबद्दल नकार व्यक्त केला आहे. शाहीर राम जोशी किर्तनकार असल्याने त्यांनी वेदविद्या संपादन केलेली होती. शृंगारिक रचनांत गढून गेलेले हे शाहीर शेवटी उपदेशाचा डामडौल पसरवीत हिंडू लागले. राम जोशींनी जनसामान्यांना केलेला उपदेश हा रोखठोक स्वरुपाचा आहे. राम जोशींनी समस्त मानवजातीला ‘‘अरे सख्या, गड्याा’’ असे संबोधले आहे. त्यामधून त्यांची मानवजातीविषयीची आत्मियता प्रकट होते. परमेश्वराशिवाय जीवनात अर्थ काय ? परमेश्वराला न वंदिता जर संसार करीत राहिले तर जगात जन्माला येऊन काहीहि साधले जात नाही, असे ते सुचवितात, परमेश्वर हाच जगाचा एकमेव आधारस्तंभ आहे. मानव हा धनसंपत्तीचा हव्यास धरणारा आहे. मुलाबाळांचा त्याला लळा आहे. तो परमेश्वराला विसरतो. तेंव्हा त्याने जीवनात काही तरी ‘‘राम नाम साधले पाहिजे. असे राम जोशींना वाटते, मानवाने भोंदू जगाची पर्वा करु नये, जे पैशाच्या मस्तीमध्ये जगतात, त्यांनाही ते सडेतोड सल्ला देतात. स्वार्थीजनापासून दूर राहण्यासाठी ते मानवाला सावध करतात.



अरे सख्या ओढितील सारे धन करी अडला (लावणी क्र. ६८)

राम जोशी मानवाला स्वहित साधण्याला सांगतात. फक्त सुखच मिळवणे, हे राम जोशींना मान्य होत नाही. भविष्यातील ओढ किंवा स्वार्थीदृष्टी किती दिवस जगवणार.‘परमेश्वराचे भजन करा’ असे ते जनसामान्यांना मनोभाव सुचवितात. कामवासना, मोह, यांना ते दूर लोटावयाला सांगतात. एवढेच नाही, ते असे ही निदर्शनास आणून देतात की, संसारातील कल्पना मानवाला दुःखाच्या गर्तेत बुडवितो, त्यासाठी त्याने भवपाश दूर केले पाहिजे. नरजन्मामध्ये येऊन स्वतःचे चांगले हित साधले पाहिजे.

राम जोशी हे उपदेश करण्याइतपत आदर्शवृत्तीचे नव्हते. स्वतः सुखलोलुपतेत व कामवासनेत गर्क असताना, दुसऱ्यांना नैतिकतेचा उपदेश करणे, हे कोणत्या अधिकारात बसते. राम जोशींचे वर्तन छंदी फंदी असल्याने ते उपदेश करण्याइतपत परिपूर्ण नव्हते.

## 2.तात्विक विचार : जगाचे स्वरुप :–

राम जोशींनी उपदेशपर लावण्यातून तात्विक विचार मांडलेला दिसून येतो. नर देहात जन्म घेणे म्हणजे मोहमायेत

गुरफटणे होय. हरीची माया अगाध आहे. जेथे ब्रह्मदेव फसले गेले, तेथे मानवाची काय कथा? नानाप्रकारचे वाईट विषय मानवाच्या मनात घुसलेले असतात. असे तात्विक विचार राम जोशी मांडतात. संसारात सुख मिळत नाही. काळाच्या गर्तेत मनुष्य नाहीसा होतो. जर्जर झालेले इंद्रिय शेवटी मानवाला दगा देतील. आयुष्याचा आलेख भरभराटीने चढत जातो. तसाच तो सरसर उतरत जातो . मानवास जेंव्हा सर्वस्व गमावण्याची पाळी येते, तेंव्हा त्याची काय स्थिती होते? घरात दमडी, ना ज्वारी, अशी अवस्था होते. जे घडणारे असते, ते सत्य अटल असते. 'जगणे मरणे' हा जीवनाचा चक्रगतीचा फेरा आहे तो विश्वाच्या गतीचा नियम आहे.

मानवाने जन्म दिलेले मुलेबाळे त्याचा घात करतील तो वृध्द होताच ते त्याची 'निबरा' म्हणूनही हेटाळणी करतील, त्याचा उपमर्द करतील. (लावणी क्र. ७८ पहा.)

नरदेह नाशीवंत आहे, ते मानवाला मुक्तिसाठी सावधानतेचा इशारा देतात. मानवकुडी नरजन्मामध्ये सार्थकी लावायची असेल, तर मानवाने नारायणाला जिवाचा सखा मानला पाहिजे.

''नरजन्मामधि नरा करुनि घे नरनारायण गडी !
तरिच हे सार्थक मानव कुडीत ''    (लावणी क्र. ७६)

मनुष्य धनासाठी नाना कला दाखवितो त्याला मुलांचा लळा मात्र सुटत नाही. जीवनामध्ये गुरुला फार महत्त्व आहे, जर गुरुला भजले नाही, तर काय होते? तर मानव नरकामध्ये पडतो. मानवी जन्मसुध्दा भलेपण मिळविण्यासाठीच आहे, त्यासाठीच जन्मामध्ये त्याने हरीचा सेवक होणे अगत्याचे आहे. तो चराचर सृष्टीमध्ये गुरुच मानवाला तारावयाला येतो. तोच संकटे निवारण करण्यासाठी समर्थ असतो. रामजोशींनी भोंदू लोकांवर कडाडून टिका केलेली आहे भोंदू स्वामीवर हल्ला चढविलेला आहे. (लावणी क्र. ८३ )परमेश्वराची भक्ती करताना मनातील भाव शुध्द असायला हवा. ढोंगी स्वरुपाचे आचरण किंवा देखावा काहीहि कामाचा नाही. बुवाबाजी व दांभिकता यावर कडकडीत अशा प्रहार त्यांनी केला आहे.

''दंडक मंडलु बंड माजविशी मुंड मुंडिशी तपा''    ( लावणी क्र. ८३)

यज्ञ, योग-जप-तप यांवर रामजोशी टिका करतात. भगवंताला भक्तीची भूक असते, तो भक्तीचा पाहुणा असतो. 'नरदेह' हा दुर्लभ असतो. या जगाचा दाता हा परमेश्वर आहे. अशा आशयाची नीतीपर रचना राम जोशींच्या लावणीत दिसते. संतसाहित्यातील उपदेशाची येथे आठवण येते, संतांच्या अंगी जे सामर्थ्य आहे राम जोशींच्या अंगी नाही, असे म्हणावेसे वाटते.

### *3.परमेश्वराचे चिंतन : जीवाचे स्वरुप :-*

राम जोशी सांगतात की, ''परमेश्वर हाच मानवी देहाचा जन्मदाता आहे. तोच विश्वाचा पालनकर्ता आहे. त्याशिवाय जगाला काहीच अर्थ व सामर्थ्य उरत नाही.''

''जाता तर नारायण संसारी मग भोंदू सारी''    ( लावणी क्र.८४)

राम जोशींनी आपल्या उपदेशपर रचनामधून परमेश्वर सामर्थ्यांचा महिमा वर्णिलेला दिसतो. त्यांच्या मनातील भक्तीहि तेथे प्रगट होते. प्रपंचामध्ये हरीला जर स्थान नसेल, तर मग मनुष्य हा भवसुखात फसला जातो. त्याचा जीव संकटात सापडतो. परमेश्वराशिवाय मनुष्यजीवन पशुवत होते.    ( लावणी क्र. ८६)

मनुष्य मात्राचा जीव जीवनमरणाच्या फेऱ्यातून फिरत राहतो. जीव त्या फेऱ्यातून सुटणार नाही. जीवाविषयी स्वतःने शोध घेतला पाहिजे. नाना योनी फिरुन, जीव जन्म घेतो. तसाच तो जगत जातो, राम जोशीच्या मनावर आध्यात्मिक विचारांचा पगडा होता, असे दिसते. शाहीर राम जोशींनी शिवाला भक्तीत महानशक्ती मानलेले आहे.

''भजभज भवजसाधिनानि मनुजा शिवाला ''

राम जोशीच्या रचनामधून परमेश्वर चिंतन दिसून येते, त्याचप्रमाणे जीवाचे स्वरुप कशा प्रकारचे आहे या विषयीही विवेचन मिळते. पण राम जोशींचा तेवढा आध्यात्मिक अधिकार नसल्याने ते सर्व पोकळ वाटते.

### *4.संसारिकांना उपदेश :- क्षणैक की चिरंतन*

राम जोशी संसारिकांना मोह टाळायला सांगतात. संसारातील पत्नी व मुले त्यांचा त्याग करा व परमेश्वराची पूजा करा. संसार कशासाठी ? तर पोरासाठी, फक्त शरीर भोगण्यासाठी, संसारातील हा भोग नष्ट केला पाहिजे, असे राम जोशीना वाटते. दार धनासाठी केवळ संसार असतो. संसारी जनाला कोणते पाप व कोणते पुण्य? हेही उलगडेना. मोहाचा चरक म्हणजे हा संसार होय. मानवाचे सुख, हे किती दिवसाचे सुख आहे. याविषयी राम जोशी म्हणतात.

'' दो दिवसाची तनु ही साची , सुरतरसाची करुनी मजा.
गमजा करिता मनि उमजना, हे सुख न पुढे पडेल वजा
भाइ सावध व्हा''   (लावणी क्र. ७६)

संसार हा मोह व मायापाश यांनी गुरफटलेला आहे. उदा. नद्यांचा महापूर काही काळाने ओसरतो त्याप्रमाणे काही काळाने वैभवाचा पूर ओसरतो. तसेच संसाराचे नाते असते! ज्याप्रमाणे कालचा दिवस आज किंवा उद्या येणार नाही. त्याप्रमाणे मानवाचे सुख कमी जास्त होणारे आहे. जोपर्यंत मदन अंगात आहे. तोपर्यंतच सर्व मौजमजा आहे. त्यानंतर हा रंग फिका होणार आहे. धनसंपत्ती गेल्यावर आवश्यक व आवडते असे, संसाराचे घर विकावे लागणार आहे. सुगंध-शाळा, गरम मसाला, हारतुरे, नाटकशाळा इ. चा मोह म्हणजे कामुक होण्याचीच लक्षणे आहेत.

जग हे मृगजलासारखे, भासमय आहे. ही मानवाला पडलेली भूल आहे. संसारामध्ये मनुष्याला सुख मिळते का ? भोवताली चार जमा होतील. मानव त्यांना पोशील व मग त्याला आधार देण्यासाठी कोणीच येणार नाही तो पुढे एकाकी पडेल.

'संसार कुणाचा गड्याा काय खटपट करशील बाई'

(लावणी क्र. ६१)

*सारांश :–*

राम जोशी उपदेशपर रचनातून मानवाच्या संसाराच्या मोहावर प्रकाश टाकतात. संसार हा क्षणाचा आहे. हे ते पटवून देतात.

अशाप्रकारे आपण या विभागात राम जोशींच्या उपदेशपर रचनांतील विचार पाहिला , त्यामधून एक जाणवते की, मानवाने संसारापासून , धन व संपत्तीपासून ,आणि मुलांबाळांपासून दूर झाले पाहिजे. त्याने विरक्ती किंवा वैराग्य स्वीकारले पाहिजे. जीवनामध्ये परमेश्वराचे चिंतन, मनन केले पाहिजे. त्याच्यावरच भक्ती ठेवली पाहिजे. अशा प्रकारचा उपदेश त्यांच्या लावण्यांमधून व्यक्त होतो.

*संदर्भ ग्रंथ :–*

१.मोरजे गंगाधर '' मराठी लावणी वाङ्मयः मोघे प्रका.पुणे १९७४
२.धोंड म.वा. ( संपा.) मऱ्हाटी लावणी : मौज प्रका. मुंबई १९५६.
३.देशमुख बी.बी. लावणी वाङ्मयः उद्गम व विकासः साहित्य सेवा प्रका. सातारा.
४.जोग रा.श्री. (संपा.) मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ३ रा महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे १९७३.
५.य.न.केळकरः तंत कवि तथा शाहीरः प्रका. न.रा.कुलकर्णी पुणे १९६५.
६.अदवंत म.ना. (संपा.) पैंजण, चित्रशाळा प्रका. पुणे १९५४.
७.शाळीग्राम शं.तु. : राम जोशीकृत लावण्या - चित्रशाळा प्रका. पुणे १९७४.
८.डॉ. कुलकर्णी वि.म. : डॉ मोरजे गंगाधरः राम जोशीकृत लावण्या.
९.सौजन्याने : शाहीर रामजोशी चित्रपट पोस्टर (इंटरनेट- चित्र)